

कसबा बावडा : शिवाजी विद्यापीठाला नॅकचे अ++ मानांकन मिळाल्याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे अभिनंदन करताना डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, आमदार ऋतुराज पाटील. सोबत प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, आयक्यूएसी सेलचे प्रमुख डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठ मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य संजय जाधव.

# योगवर्गाचे नॅक समितीकडून कौतुक

## अभिनव उपक्रम म्हणून गौरव; व्याप्ती आणखी वाढविण्याचा विचार सुरू

**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठात २०१५ पासून योग प्रशिक्षण वर्ग सुरू आहे. याचा लाभ विद्यापीठातील विद्यार्थ्यांना तर होतोच; पण नागरिकही या वर्गात सहभागी होतात. नुकत्याच झालेल्या 'नॅक' मूल्यांकनाच्या पार्श्वभूमीवर समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. जे. के. शर्मा यांनी योगवर्गाला भेट दिली. विद्यापीठाचा हा अभिनव उपक्रम कौतुकास्पद असून, याची व्याप्ती आणखी वाढवली पाहिजे, असे गौरवोद्‌गारही त्यांनी काढले. जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात हा योग प्रशिक्षण वर्ग सुरू असून, सध्या रोज ५० जण योगाचे प्रशिक्षण घेतात.

२१ जून २०१५ ला पहिला जागतिक योग दिवस जगभर साजरा झाला. या दिवसापासून योग प्रशिक्षण वर्ग सुरू झाला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात घेतला जाणारा योग प्रशिक्षण वर्ग.**

सलग चार वर्षे हा वर्ग कणेरी मठाच्या सहकार्याने सुरू होता. यात विद्यापीठातील विद्यार्थी सहभागी व्हायचेच. याशिवाय, शहरातील नागरिकही योगासने शिकण्यासाठी येत होते. रोज सुमारे १०० ते १५० जण या योगवर्गाचा लाभ घ्यायचे. लॉकडाउनच्या काळात योगवर्ग काही काळासाठी बंद झाला. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून तो पुन्हा सुरू झाला आहे. रोज सकाळी साडेसहा ते आठ या कालावधीत हा वर्ग होतो. योग प्रशिक्षक सूरज पाटील हा वर्ग घेतात. सध्या या वर्गाला ५० पर्यंत उपस्थिती असते. विविध प्रकारची आसने, श्‍वसनाचे विविध प्रकार यासह निरोगी शरीरासाठी आवश्यक असणारी आसने येथे शिकवली जातात. गेल्या महिन्यात विद्यापीठाचे 'नॅक' मूल्यांकन झाले. यासाठी आलेल्या समितीचे अध्यक्ष डॉ. शर्मा यांनी सकाळी स्वतः येऊन योगवर्गाला भेट दिली. योग वर्गातील उपस्थिती, तेथील वातावरण पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. आता हा योगवर्ग विद्यार्थी विकास विभागामार्फत चालविला जाणार असून, याची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने विचार सुरू आहे.



**“ योग प्रशिक्षण वर्ग हा केवळ एक उपक्रम नसून, याद्वारे भारतीय योगाचा प्रचार व प्रसार केला जातो. या उपक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. भविष्यात याची व्याप्ती अधिक वाढवली जाईल. जेणेकरून अधिकाधिक नागरिकांना याचा लाभ घेता येईल.**

**- प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव,**
संचालक, विद्यार्थी विकास विभाग

# तातडीच्या कामाशिवाय विद्यापीठ कार्यालयात प्रवेश नाही : डॉ. नांदवडेकर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कार्यालयातील गर्दी कमी करण्यासाठी अभ्यागतांना तातडीच्या कामाशिवाय कार्यालयामध्ये प्रवेश करण्यास परवानगी असणार नाही. ज्या अभ्यागतांना बैठकीसाठी बोलविले आहे, संबंधित विभाग, कार्यालय प्रमुखांनी अभ्यागतांना विशेष पास द्यावेत, अशा सूचनांचे परिपत्रक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी काढले आहे.

कोरोनाच्या संसर्ग रोखण्यासाठी आणि तातडीने उपाययोजना व सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश आहेत. त्याअनुषंगाने मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत. तोंडाला मास्क लावल्याशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही, असेही पत्रकात म्हटले आहे.